# पाणीपुरवठा उद्या बंद

## जलवाहिन्यांच्या गळती दुरुस्तीसह अन्य कामांमुळे निर्णय

### ६०० एमएलडी पाण्याची बचत



लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** संपूर्ण शहरात जलवाहिन्यांची गळती, व्हॉल्व्ह दुरुस्ती व बदलांची कामे व्यापक स्वरुपात हाती घेतली जाणार असल्याने शनिवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे. रविवारी सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होईल, असे नाशिक महापालिकेने म्हटले आहे.

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील महत्त्वाच्या जल वाहिन्यांची गळती रोखण्यासह अत्यावश्यक दुरुस्ती कामांसाठी शहराचा पाणीपुरवठा दिवसभरासाठी बंद ठेवणे क्रमप्राप्त ठरले आहे. काही कामे एक ते दीड महिन्यांपासून प्रलंबित आहेत. गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या काळात संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद करणे योग्य नव्हते. त्यामुळे दिवाळीपूर्वी पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी जल वाहिन्यांमधील गळती बंद करणे व अन्य कामे करण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

**या कामांचा समावेश**

सातपूर, नवीन नाशिक, नाशिक पश्चिम, नाशिकरोड, पंचवटी आणि नाशिक पूर्व अशा सर्व विभागांत व्यापक जल वाहिन्यांची दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहे. यात मुख्य जल वाहिन्यांची गळती बंद करणे, जलकुंभाची वितरण वाहिनी अस्तित्वातील वाहिनीला जोडणे, नवीन व्हॉल्व बसवणे, 'क्रॉस कनेक्शन' आदींचा समावेश आहे.

**नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन**

या कामांसाठी अंदाजे १२ ते १८ तास पाणीपुरवठा बंद ठेवणे आवश्यक असून शनिवारी ही कामे करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे संपूर्ण नाशिक शहराचा शनिवारी दिवसभर पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे.

रविवारी सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने म्हटले आहे.

- दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर, शासनाने १६ ऑक्टोबरपासून ९० टक्के पाणी पात लागू करण्याचे निर्देश देऊनही नाशिक महानगरपालिकेने तसा निर्णय घेतलेला नाही. पाणी आरक्षणानंतर कपातीबाबत निर्णय घेण्याचे धोरण महापालिकेने ठेवले आहे.
- पाणी आरक्षणाचा निर्णय पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समिती घेते. नाशिकचे पालकमंत्री असणारे गिरीश महाजन हे राज्याच्या जलसंपदा विभागासह कुंभमेळ्याची जबाबदारी सांभाळत आहेत. मध्यंतरी महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी शासनाच्या निर्देशानुसार पाणीकपात करावी लागेल, असे संकेत दिले होते. परंतु, अद्यापपर्यंत तसा निर्णय झालेला नाही. शहराचा पाणीपुरवठा एक दिवसासाठी बंद राहिल्यास ६२० एमएलडी पाण्याची बचत होते.
- थेट पाणीकपात लागू करणे शहरवासीयांमध्ये नाराजीचा विषय ठरू शकतो. देखभाल दुरुस्तीमुळे




पाणी पुरवठा बंद राहिल्यास तसे घडत नाही. त्यामुळे या निर्णयाकडे अघोषित पाणीकपातीच्या अंगाने काही जणांकडून बघितले जात आहे. परंतु, मनपाच्या अधिकाऱ्यांनी ही बाब अमान्य केली.

# रिंग रोडबाधित शेतकऱ्यांच्या लढ्याला यश

## महत्त्वपूर्ण मागण्यांविषयी फेरसर्वेक्षणाचे शासनाचे आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, हाती घेतलेल्या नाशिक परिक्रमा मार्ग अर्थात रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेत झालेली कथित अनियमितता, जमिनींच्या मोबदल्यात झालेल्या त्रुटी, गुणांक निश्चित करताना अन्याय आणि पाण्याची उपलब्धता असूनही जमिनींची जिरायती म्हणून करण्यात आलेली नोंद, या प्रश्नांवर शेतकऱ्यांच्यावतीने सातत्याने आंदोलने करण्यात आली. याची दखल घेऊन शासनाने दोन महत्त्वाच्या मागण्यांसंदर्भात आदेश दिले आहेत.

शासन आदेशांतर्गत ग्रामीण भागात शेती विभागातील कृषी जमिनींना गुणांक एक ऐवजी गुणांक दोननुसार भूसंपादन मोबदला देण्याचा निर्णय घेतला असून बागायती जमिनींची जिरायती नोंद झालेल्या जमिनींचे फेरसर्वेक्षण केले जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वर्षा निवासस्थानी मध्यंतरी शेतकरी शिष्टमंडळाची बैठक झाली. या बैठकीत शेतकरी नेते करण गायकर यांनी रिंग रोड प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात शेतकऱ्यांच्या विविध तक्रारी, चुकीच्या नोंदी, मोबदला निश्चित करताना झालेल्या त्रुटी आणि प्रशासकीय निर्णयांमुळे शेतकऱ्यांवर होणारा अन्याय याविषयी सविस्तर माहिती मांडली होती. रिंग रोडच्या भूसंपादनावरून बाधित शेतकऱ्यांकडून आंदोलने सुरू होती. शेतकऱ्यांची एकजूट, आणि पुराव्यांच्या आधारे केलेला पाठपुरावा यामुळे न्यायाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे, अशी प्रतिक्रिया छावा क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष करण गायकर यांनी व्यक्त केली.

### आता गुणांक दोन लागू होणार

रिंगरोड प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेत काही गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनींसाठी गुणांक दोन ऐवजी गुणांक एक लागू करण्यात आल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळाल्याची तक्रार होती. रिंग रोड प्रकल्पात ग्रामीण भागातील शेती विभागातील कृषी जमिनींना गुणांक दोन नुसार भूसंपादन मोबदला देण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. परंतु, हा निर्णय केवळ नाशिक परिक्रमा मार्ग (रिंगरोड) या एकाच प्रकल्पासाठी घेतल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

### जिरायती नोंद झालेल्या जमिनींचे फेरसर्वेक्षण

रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेत काही शेतकऱ्यांच्या जमिनींना पाण्याची उपलब्धता असूनही त्यांची जिरायती म्हणून नोंद केल्याच्या तक्रारी होत्या. या संदर्भात १५ गावांतील १८५ शेतकऱ्यांचे तक्रार अर्ज केले होते. आता त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित जमिनींचे फेरसर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महसूल व कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष संयुक्त पाहणी करून त्यातील सिंचन साधनांवरून जिरायती, हंगामी बागायती किंवा बागायत हा निर्णय घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. सर्वेक्षण करून अहवाल नाशिक जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा, असे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत.

# सप्तशृंग गडावर आजपासून वाहतूक निर्बंध



**नाशिक :** सप्तशृंगी गड येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने वाहन प्रवेशबंदीच्या कालावधीत बदल केला आहे. त्यानुसार नांदुरी ते सप्तशृंगी गड या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बससेवा वगळता इतर सर्व प्रकारच्या दुचाकी वाहनांना २३ ऑक्टोबर रोजी सकाळी सहापासून ते २६ ऑक्टोबर रोजी सकाळी सहापर्यंत प्रवेशबंदी लागू केली असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी कळविले आहे. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून भाविक येतात. घाट रस्ता अरुंद व वळणावळणाचा असल्याने वाहतुकीची कोंडी होऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, या दृष्टीने खासगी वाहनांना प्रवेशबंदी लागू केली आहे.

# सिंहस्थ कुंभमेळाच्या सर्वंकष माहितीसाठी संकेतस्थळ

## राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वजारोहण दिनाला शुभारंभ

### विविध भाषांमधून माहिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक –** नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने संकेतस्थळ विकसित करण्यात येत आहे. भाविकांना कुंभमेळ्याशी संबंधित अधिकृत व विश्वासार्ह माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे तसेच यात्रेचे नियोजन अधिक सुलभ करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कुंभमेळा पर्वास ३१ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहणाने सुरुवात होत आहे. याच दिवशी सायंकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या संकेतस्थळाच्या प्राथमिक आवृत्तीचे अनावरण करण्यात येणार आहे.

प्रारंभी कुंभमेळ्याची मूलभूत माहिती उपलब्ध करून देणारे हे संकेतस्थळ पुढील टप्प्यांत अधिक सक्षम करण्यात येईल. त्यामध्ये अद्ययावत माहिती, विविध डिजिटल सुविधा आणि संबंधित यंत्रणांच्या प्रणालींशी समन्वय साधणाऱ्या सुविधा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येतील. संकेतस्थळात मोबाइल ॲप्लिकेशन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित भाविक सहाय्य प्रणाली 'कुंभदूत' यांचाही समावेश प्रस्तावित आहे.

**स्वरूप असे असणार**

कुंभमेळ्याचा इतिहास, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा, महत्त्वाची मंदिरे, घाट, आखाडे आणि धार्मिक स्थळांची माहिती उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. पर्वणी स्नानाच्या तारखा व वेळा, महत्त्वाच्या घोषणा, सूचना आणि भाविकांसाठी आवश्यक मार्गदर्शनही या माध्यमातून उपलब्ध होईल.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पोहोचण्यासाठी हवाई, रेल्वे, रस्ते आणि स्थानिक वाहतुकीसंबंधी माहिती एकाच ठिकाणी देण्यात येणार आहे.

# येवला शहर पाणीपुरवठा योजनेचे आज भूमिपूजन

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** येवला शहराच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर झालेल्या १६०.२५ कोटी रुपयांच्या येसगाव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन अन्न,नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता येवल्यातील महात्मा फुले नाट्यगृहात होणार आहे. यावेळी आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ यांच्यासह प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मंत्री भुजबळ यांच्या माध्यमातून ही पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. येवला नगरपालिकेच्या माध्यमातून साकारण्यात येणाऱ्या या योजनेमुळे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होण्यास मदत होणार आहे. सन २०५६ पर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करून नियोजित केलेल्या या प्रकल्पातून शहरातील विद्यमान तसेच नव्याने विकसित होणाऱ्या भागांना पुरेसे आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

### येसगावला तलाव उभारणार

या योजनेअंतर्गत येवला नगरपालिकेच्या मालकीच्या येसगाव येथील ३.५५ हेक्टर जागेत ३०० दशलक्ष लिटर क्षमतेचा आरसीसी साठवण तलाव उभारण्यात येणार आहे. गोदावरी डाव्या कालव्यातून जलवाहिनीद्वारे या तलावात पाणी आणण्यात येईल. तेथून ६०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीद्वारे पाणी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचविण्यात येणार असून, शुद्धीकरणानंतर पंपिंग यंत्रणेच्या मदतीने उंच जलकुंभांमध्ये पाणी साठवून शहरात वितरित केले जाईल.

# त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालय पाडकामास अखेर प्रारंभ

## तुपेवाडी फाटा परिसरातील रुग्णालयात स्थलांतर

### रुग्णांचे प्रमाण वाढले

चारूशीला कुलकर्णी, लोकसत्ता

**नाशिक –** त्र्यंबकेश्वर येथे दर्शनपथासाठी उपजिल्हा रुग्णालयाचे पाडकाम सुरू झाल्याने, रुग्णालय त्र्यंबकेश्वरमध्येच इतरत्र तात्पुरत्या स्वरूपात हलविण्यात येईल, ही पंचक्रोशीतील नागरिकांची आशा मावळली आहे. उपजिल्हा रुग्णालय शहराजवळील तुपेवाडी फाटा परिसरात स्थलांतर झाल्यानंतर आतापर्यंत १० हजारांहून अधिक रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला आहे.

त्र्यंबकेश्वर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी पाहता राज्य शासनाच्या वतीने दर्शनपथ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्ताने पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र विकास निधीमधून २७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. महाराष्ट्र पायाभूत विकास महामंडळ यासाठी काम करत आहे. त्र्यंबकेश्वरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते कुशावर्त तीर्थ भागाचा चेहरा या कामामुळे बदलण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी शिवनेरी धर्मशाळा, देवस्थानचे उत्तर महाद्वारनजीक असलेले गाळे, पंडित जवाहरलाल नेहरू व्यापारी संकुल, पंचायत समिती व्यापार संकुल, एसटी बस स्थानकासमोरील व्यापारी संकुल, तहसीलदार कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना, कामगार चाळ, अहिल्या गोदावरी संगमावरील देवस्थानच्या जागेतील पुरोहितांचे शेड यासह त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालय पाडण्यात येत आहे.

उपजिल्हा रुग्णालय पाडण्यास स्थानिकांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी विरोध दर्शविला. परंतु, हा विरोध झुगारत उपजिल्हा रुग्णालय तुपादेवी फाटा परिसरातील स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या रुग्णालयात स्थलांतरित केले. उपजिल्हा रुग्णालय त्र्यंबकेश्वर परिसरात असावे, ही मागणी जोर धरत आहे. यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून समितीने त्र्यंबकेश्वरमध्ये जागा निश्चित केली.

उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, उपजिल्हा रुग्णालय स्थलांतर होण्यास दोन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. रुग्णालय गावात असताना दिवसाला बाह्यरुग्ण विभागात २०० हून अधिक रुग्णाची तपासणी होत असे. सध्या ही संख्या १५० ते १७५ आहे. असे असले तरी या ठिकाणी प्रसूती कक्षात तसेच इतर रुग्ण दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे.


बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**मालेगांव अंचल कार्यालय**
बी.एस.एन.एल. संचार सदन, सटाणा नाक्याजवळ मालेगाव 423203
प्रधान कार्यालय: लोकमंगल 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.

**स्थावर मालमत्तेच्या विक्री करिता विक्री सूचना**

दि सेक्यूरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट्स ॲक्ट 2002 आणि त्यासह वाचण्याच्या सेक्युरिटी इंटरेस्ट्स (एन्फ़ार्समेंट) रुल्स 2002 मधील रुल 8(6) च्या अटींनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्री करिता ई- ऑक्शन विक्री सूचना

या ठिकाणी सर्व साधारण जनतेस आणि विशेष करुन कर्जदार आणि जामिनदाराना सूचना देण्यात येते की , खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता , ज्या सुरक्षित धनको (सिक्युर्ड क्रेडिटर) बैंक ऑफ महाराष्ट्र यांच्या कडे गहाण / बोज्या अंतर्गत आहेत आणि बैंक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यानी सदर मालमत्तांचा **प्रत्यक्ष/ सांकेतिक ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची विक्री **दि. 09/11/2026 रोजी 01.00 ते 05.00 दरम्यान "जसे आहे जेथे आहे ","जे आहे जसे आहे,"तेथे जे आहे"** , या तत्वावर बैंक ऑफ महाराष्ट्र यांना खाली नमूद केलेल्या परिशिष्टामधील कर्जदार व जामीनदार यांच्या कडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी ई - ऑक्शनद्वारे केली जाणार आहे कर्जदार आणि जामिनदारांकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील माहिती असलेला बोज़ा, ताब्याचा प्रकार,राखीव किमत, बयाणा रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| अनु. क्र. | कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव | येणे रक्कम | स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि माहीत असलेला बोज़ा | राखीव किमत<br>बयाणा रक्कम<br>बोली वाढविण्याची रक्कम (सर्व तीन कर्जदार खात्यांची एकत्रित रक्कम) |
|---|---|---|---|---|
| 1. | **मेसर्स पी. स्क्वेअर क्रिएशन्स त्यांच्या द्वारे भागीदार 1. श्री.हेमंत प्रभाकर पाटील 2. श्री.भारत विश्वासराव पाटील 3. श्री जयंतीलाल देवाशी पटेल 4. श्री. हसमुख देवाशी पटेल शाखा - मालेगाव (नाशिक)** | रु. 80,88,358/- 02/04/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क<br>रु. 33,27,277/- 01/08/2026 पर्यंत अधिक लागु न झालेले व्याज, कायदेशिर आणि इतर खर्च/ शुल्क | नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले **प्लॉट नं. 7,** क्षेत्रफळ 504.00 चौ.मी. आणि प्लॉट नं. 8, क्षेत्रफळ एरीया 504 चौ.मी. आणि प्लॉट नं. 16, क्षेत्रफळ एरीया 514.03 चौ.मी. ज्यापैकी असलेले जी.नं. 1542/2ए/1+1542/2बी आणि त्यावरील बांधकामासह दाभाडी, मालेगाव. **प्लॉट नं. 16 ची चतुर्सिमा : पूर्व** - अतिरिक्त एस नं., **पश्चिम** - 15 मीटर रोड, **उत्तर** - प्लॉट नं. 15, **दक्षिण** - प्लॉट नं. 17. **प्लॉट नं. 7 + 8 ची चतुर्सिमा : पूर्व** - रोड, **पश्चिम** - रोड, **उत्तर** - खुली जागा, **दक्षिण** - सुविधा प्लॉट नं. 18. **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.** | रु. 1,18,66,000/- (रुपये एक कोटी अठरा लाख सहासष्ट हजार फक्त)<br>रु. 11,86,600/- (रुपये अकरा लाख शहाऐंशी हजार सहाशे फक्त)<br>रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त ) |
| 2. | **श्री बळीराम रामदास कलवार जमानतदार : 1. श्री. दिनेश सुभाष सांगळे 2. श्री योगेश अशोक सांगळे शाखा - मनमाड** | रु. 9,53,566/- 21/01/2023 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क | **संपत्तीचे मालक : श्री. बळीराम रामदास कलवार** नोंदणीकृत गहाण असलेली संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले संपत्ती समावेश रो हाऊस नं. 07, क्षेत्रफळ 48 चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळ एरीया 515 चौ.फुट "साई रेसिडेन्सी" नावानी परिचीत प्लॉट नं. 8 वरील बांधकामासह स्थित सर्व्हे नं. 142/ए1/ए5, कॅम्प एरीया मनमाड जवळ, क्षेत्रफळ 65.50 चौ.मी. पोस्ट मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक. **चतुर्सिमा : (पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण) : पूर्व** - रो हाऊस नं. 06, **पश्चिम** - रो हाऊस नं. 08, **उत्तर** - रोड, **दक्षिण** - प्लॉट नं. 7 आणि 8. **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा.** | रु. 9,80,000/- (रुपये नऊ लाख ऐंशी हजार फक्त)<br>रु. 98,000/- (रुपये अठ्ठ्याण्णव हजार फक्त)<br>रु. 20,000/- (रुपये वीस हजार फक्त ) |
| 3. | **मेसर्स ए. के. ट्रेडर्स त्यांच्या द्वारा प्रोप्रायटर : श्री. एर्ड्स अहमद मोहम्मद आरिफ जमानतदार : श्री. मोहम्मद शहजाद मोहम्मद आरिफ (शाखा : मालेगाव (नाशिक)** | रु. 3,07,85,732/- 06/01/2026 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क | **मालमत्ता धारकाचे नाव : श्री. एर्ड्स अहमद मोहम्मद आरिफ** नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले जमिन आणि बिल्डींग स्थित सीटीएस नं. 1394/3, इस्लामपुर येथे तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक, प्लॉटचा क्षेत्रफळ एरीया 122.68 चौ.मी. **चतुर्सिमा : पूर्व** : सीटीएस नं. 1394/3 भाग, **पश्चिम** : सीटीएस नं. 1394/2, **उत्तर** : रोड, **दक्षिण** : गल्ली. CERSAI ID : 07AAECC5770G1ZN \| Asset ID: 200063158382 **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा** | रु. 95,86,000/- (रुपये पंच्याण्णव लाख शहाऐंशी हजार फक्त)<br>रु. 9,58,600/- (रुपये नऊ लाख अठ्ठावन्न हजार सहाशे फक्त)<br>रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त ) |

**ई-लिलाव तारीख 09/11/2026, दुपारी 01.00 ते सायं. 05.00 वाजेपर्यंत**

मालमत्तेच्या पहाणीची तारीख व वेळ : दिनांक 26/10/2026 ते 07/11/2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 दरम्यान.

बयाना रक्कम आणि प्रूफ सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक 08/11/2026 रोजी सायं 5.00 पर्यंत.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया बँके च्या वेबसाइट वरिल लिंक - https://bankofmaharashtra.bank.in तसेच पिएसबी अलायंस ई-बिक्रय https://baanknet.com/eauction-psb/x-login वर देखील प्रदान केले आहे किंवा यांच्याशी संपर्क साधावा **श्री. अनस अली, मोबाइल नं. 9718617198, श्री. चेतन कापडणीस, मोबाईल नं. 8956495433 आणि श्री. ज्ञानेश्वर घडाडे, मुख्य व्यवस्थापक, मोबाइल नं. 8459141304**

**स्थान : मालेगाव**
**दिनाक : 22/10/2026**

**अधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक**
**बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव झोन**

(सदर नोटीस ही मूळ इंग्रजी नोटिसचे भाषांतर असून, अर्थाच्या सोयीकरीता इंग्रजी भाषेतील नोटीस ग्राह्य धरली जाईल)


# सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प लवकरच कार्यान्वित

## अंबडमध्ये अधिकारी, पदाधिकाऱ्यांकडून कामांची पाहणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** अंबड तसेच सातपूर परिसरातील औद्योगिक वसाहतींमध्ये रसायनयुक्त दूषित पाण्याचा प्रश्न गाजत आहे. याप्रकरणी ३० हून अधिक कंपन्यांचा वीज तसेच पाणीपुरवठा बंद केला. या पार्श्वभूमीवर, अंबड औद्योगिक वसाहतीतील प्लेटिंग उद्योगांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (सीईटीपी) उभारणी अंतिम टप्प्यात असून हे केंद्र लवकरच कार्यान्वित होणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) अधिकारी आणि अंबड इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (आयमा) पदाधिकाऱ्यांनी या कामाची संयुक्त पाहणी केली.

अंबड औद्योगिक वसाहत परिसरातील २० हून अधिक कंपन्यांवर रसायनमिश्रित दूषित पाण्यामुळे कारवाई केली. कंपन्यांचा वीज आणि पाणीपुरवठा बंद केला. अनेक कंपन्यांना नोटी बजावली. कंपन्यांतील दूषित पाणी हे कारवाईचे मूळ कारण असून यासाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी औद्योगिक संघटनांकडून होत आहे. काही वर्षांपासून रखडलेला हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्लेटिंग उद्योगांमधील रसायनयुक्त सांडपाण्याच्या प्रक्रियेचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असल्याने उद्योजकांना मोठा दिलासा मिळेल. पुढील तीन महिन्यांत हा प्रकल्प कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. प्रकल्पाच्या संयुक्त पाहणीवेळी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता कल्पेश लहिवाल, प्लेटिंग असोसिएशनचे पदाधिकारी विनायक गोखले, समीर पटवा आणि सुदर्शन डोंगरे उपस्थित होते. आयमाचे अध्यक्ष राजेंद्र पानसरे आणि सरचिटणीस संजय महाजन यांनी संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करून त्याच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती घेतली. आढळलेल्या त्रुटी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्या तातडीने दूर करून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



अंबड येथे सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कामाची एमआयडीसीचे अधिकारी आणि अंबड इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (आयमा) पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली.

### प्रकल्पाचे स्वरूप

या प्रकल्पात प्रत्येकी ५० हजार लिटर रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेले एकूण ९० संच आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पाची एकूण प्रक्रिया क्षमता पाच लाख लिटर इतकी आहे. यापैकी दोन संचांची चाचणी सुरू केली असून उर्वरित यंत्रणा कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने पुढील काम महत्त्वाचे ठरणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यामुळे प्लेटिंग उद्योगांमधील रसायनयुक्त सांडपाण्यावर सामूहिकरीत्या प्रक्रिया करणे शक्य होईल.

अंबड एमआयडीसीतील प्लेटिंग उद्योगांसाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित होणे अत्यंत गरजेचे आहे. रसायनयुक्त सांडपाण्याची योग्य पद्धतीने प्रक्रिया झाल्यास उद्योजकांना मोठा दिलासा मिळेल. औद्योगिक विकास आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही बाबी एकत्रितपणे साध्य करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामातील त्रुटी तातडीने दूर करून तो पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी कार्यवाही करावी. आयमाच्या वतीने या कामाचा पाठपुरावा सुरू राहील.

– राजेंद्र पानसरे, (अध्यक्ष, अंबड इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन)